भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांची मान्यता प्राप्त असलेल्या खालील विषयातील पदव्युत्तर पदवी धारण करणारा उमेदवार अध्यापकीय संवर्गातील पदावरील नियुक्तीसाठी पात्र राहील.

१) " बालरोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

२) " मनोविकार परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

३) " सार्वजनिक आरोग्य परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

४) " स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

५) " वैद्यक व शल्यचिकित्सा परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

६) " कर्करोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

# **NOTIFICATION**

Medical Education and Drugs Department,

Gokuldas Tejpal Hospital Campus 7th Floor,

LokmanyaTilak Marg,New Manatralaya , Mumbai

Dated the 2022.

| | |
|---|---|
| **Constitution of India.** | No SEPRANI-3019/C.R.117/VAISEVA-4 In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Professor, Group-A (*Gazetted*), Associate Professor, Group-A (*Gazetted*) and Assistant Professor, Group- B (*Gazetted*) in a Government Dental College and Hospital on the establishment of the Directorate of Medical Education and Research under the Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra, namely:- |

1. These rules may be called the Professor, Group-A (*Gazetted*), Associate Professor, Group-A (*Gazetted*) and Assistant Professor, Group- B (*Gazetted*) in a Government Dental College and

| | | |
|---|---|---|
| | | Hospital on the establishment of the Directorate of Medical Education and Research under the Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2023. |
| **2.** | **In these rules unless the context requires otherwise,-** | |
| | (i) | **“Government”** means the Government of Maharashtra; |
| | (f) | "**Department**" means the Department of Medical Education and Drugs Department as specified in the First Schedule to the Government of Maharashtra Rules of Procedure made under Article-166 of the Constitution of India; |
| | (h) | "**Directorate**" means the Directorate of Medical Education and Research, State of Maharashtra under the administrative division of Medical Education and Drugs Department; |
| | (d) | **“Commission”** means the Maharashtra Public Service Commission. |
| | (e) | “**Council**” means the Dental Council of India, New Delhi or any other equivalent authorized body appointed by Government of India in place of Dental Council of India; |
| | (k) | **“Master of Dental Surgery (M.Ds)”** means the post graduate degree of a statutory University; |
| | (g) | “**Diplomate of National Board**” means the degree |

| | | |
|---|---|---|
| | | awarded by the National Board of Examinations; |
| | (b) | "**Assistant Professor**" means a Assistant Professor in a Government Dental College and Hospital under the Directorate of Medical Education and Research in any subject of Dental Surgery; |
| | ( c) | "**Associate Professor**" means a Associate Professor in a Government Dental College and Hospital under the Directorate of Medical Education and Research in any subject of Dental Surgery; |
| | (l) | "**Professor**" means a Professor in a Government Dental College and Hospital under the Directorate of Medical Education and Research in any subject of Dental Surgery; |
| | (m) | "**Recognized Dental College**" means a Dental College recognized by the Dental Council of India or any other equivalent authorized body appointed by Government of India, in place of the Dental Council of India; |
| | (n) | "**Recognized Medical College**" means a Medical College recognized by the Medical Council of India or National Medical Commission; |
| | (o) | "**Schedule-I**" means the Schedule-I appended to these rules; |
| | (p) | "**Schedule-II**" means the Schedule-II appended to |

| | | |
|---|---|---|
| | | these rules. |
| | (a) | "**Appointing Authority**" means<br>(i) the Hon'ble Chief Minister, State of Maharashtra, is the competent authority to appoint candidates to the relevant Group-A post in the Government Service;<br>(ii) The Hon'ble Minister of the Department is the competent authority to appoint candidates to the respective posts of Group-B; |
| | (j) | "Eligibility subject to the Seniority" means the eligibility in accordance with the terms and conditions prescribed for promotion vide General Administration Department Government Resolution dated 01.08.2019 and further orders issued in this behalf from time to time; |
| **3.** | **<u>Appointment to the post of Professor (Group-A), (Gazetted) shall be made either,-</u>**<br>(a) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Associate Professor, Group-A in concerned subject in Government Dental Colleges and Hospitals, possessing educational qualifications and experience mentioned in columns (3) and (4), respectively against entry at serial No.1 of the Schedule-I, and should have acquired total score of minimum 30 points regarding Research Publications as per the provisions of the Schedule-II; or<br>(b) by nomination from amongst the candidates | |

| | |
|---|---|
| | recommended by the Commission on the basis of result of Competitive Examination conducted therefor / who fulfill the following criteria, namely:-<br><br>**(i) Age limit -**<br>(A) Lower Age Limit : eighteen years completed.<br>(B) Upper Age Limit : fifty years of age completed for the persons belonging to open category and fifty-five years of age completed for the persons beloning to reserved category.<br>Provided that the age limit for candidates who are already in Government service shall be relaxed for further five years:<br>provided further that, the reserved category candidates who are already working in the Government service can avail relaxation of age limit either for Government service employees or for backward class employees.<br>(III) Reckoning of age limit : It shall be necessary to fulfill above lower and upper age limit on the final date of receipt of applications as stated in the advertisement for the recruitment to the concerned post.<br>**(ii) Minimum Educational Qualification -**<br>Possess qualifications and experience mentioned in columns (3) and (4), respectively, against entry at serial no.1 of the Schedule-I and should have acquired total score of minimum 30 points regarding research publications as per the provisions of the schedule-II; |
| **4** | **Appointment to the post of Associate Professor (Group-** |

| | | |
|---|---|---|
| | | **<u>A), (Gazetted) shall be made either,-</u>**<br>(a) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness, from amongst the persons holding the post of Assistant Professor (Group- B) in the concerned subject in the Government Dental Colleges and Hospitals, possessing educational qualifications and experience mentioned in columns (3) and (4), respectively, against entry at serial No.2 of the Schedule-I and should have acquired total score of minimum 20 points regarding Research Publications as per the provisions of the Schedule-II; or<br>(b) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of result of Competitive Examination conducted therefor, who fulfill the following criteria, namely:-<br>**(1) Age limit :**<br>(I) Lower Age Limit : eighteen years completed.<br>(II)Upper Age Limit : fortyfive years completed for the persons belonging to open category and fifty years completed for the persons beloning to reservedcategory:<br>Provided that the age limit for candidates who are already in Government service shall be relaxed for further five years:<br>Provided further that, the reserved category class candidates who are already working in the Government service can avail relaxation of age limit either for Government service employees or for reserved category |

| | |
|---|---|
| | employees.<br>(III) Reckoning of age limit : It shall be necessary to fulfil above lower and upper age limit on the final date of receipt of applications as stated in the advertisement for the recruitment to the concerned post.<br>**(2) Minimum Educational Qualification -**<br>Candidate should possess qualifications and experience mentioned in columns (3) and (4), respectively, against entry at Serial No.2 of the Schedule-I and should have acquired total score of minimum twenty points regarding Research Publications as per the provisions of the Schedule-II; |
| **5** | **<u>Appointment to the post of Assistant Professor (Group-B), (Gazetted) shall be made either,-</u>**<br>(a) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of dental surgeon, group-B in the Government Dental or Medical Colleges and Hospitals, possessing educational qualifications and experience mentioned in columns (3) and (4), respectively, against entry at Serial no. 3 of the Schedule-I; or<br>(b) by nomination of candidates recommended by the Commission on the basis of result of Competitive Examination conducted therefor, who fulfill the following criteria, namely:-<br>**(1) Age limit :**<br>(I) Lower Age Limit : eighteen years completed. |

| | |
|---|---|
| | (II)Upper Age Limit : forty years completed for the persons belonging to open category and forty-five years completed for the persons belonging to reserved category:<br>Provided that the age limit for candidates who are already in Government service shall be relaxed for further five years.<br>Provided further that, the reserved category candidates who are already working in the Government service can avail relaxation of age limit either for Government service employees or for backward class employees.<br>(III) Reckoning of age limit : It shall be necessary to fulfil above lower and upper age limit on the final date of receipt of applications as stated in the advertisement for the recruitment to the concerned post.<br>**(2) Minimum Educational Qualification :**<br>Candidate should possess qualifications and experience mentioned in columns (3) and (4), respectively, against entry at Serial No. 4 of the Schedule-I |
| **6** | Appointment to the posts mentioned in rules 3 and 4, shall be made by promotion and nomination in the ratio 50:50 respectively.<br>Appointment to the posts mentioned in rule 5, shall be made by promotion and nomination, in the ratio 15:85, respectively:<br>Provided that, if the suitable candidates for appointment by are not available, the ratio of |

| | |
|---|---|
| | appointment by promotion and by nomination may be relaxed for that particular appointment year after the consent of the Appointing Authority. |
| **7** | **<u>PROBATION PERIOD</u> :-**<br><br>The person who has been appointed on the posts mentioned in rules 3 to 5 [Group-A (Gazetted) and Group-B (Gazetted), by nomination shall be on probation for the period of two years. The probation period may be extended up to maximum one year at the discretion of the Competent Authority. Completion of this probation period (including extended period) satisfactorily, as per the probation policy of the Government, and completion of prescribed training, if any, mandatory. In the event of failing to complete the probation period (including extended period) satisfactorily, as per the probation policy of the Government or in the event of not completing the prescribed training, his/her services shall liable to be terminated. |
| **8** | (A) It shall be mandatory for the Government Servant who has been appointed by promotion to the posts mentioned in the rules 3 to 5, either to pass Hindi and Marathi Language Examination as regulated by the Government (Marathi Language Department), from time to time, regarding passing of these examination or to get exemption from passing of these examination before getting promoted to the said posts. Otherwise, such Government Servants shall not be eligible for promotion |

| | | |
|---|---|---|
| | | on higher post.<br>(B) If any Government servant who has been appointed by nomination to the posts mentioned in rule 3 to 5, has not passed the Hindi and Marathi Language Examination before appointment, as regulated by the Government (Marathi Language Department), from time to time, regarding passing these examination or he/she has not been exempted from passing of these examinations, then he/she is required to pass these examination, within the prescribed time limit. If such Government Servant shall fails to pass Hindi and Marathi Language Examinations within the prescribed time limit, then he/she shall not be entitled for annual increment till passing of these examinations. Further he/she shall not be entitled for promotion till passing these examinations. |

| | |
|---|---|
| **9** | **(A)** It shall be mandatory for the Government Servant who has been appointed by promotion to the posts mentioned in rules 3 to 5, either to possess the Computer Operation Certificate as regulated by the Government (General Administration Department / Information Technology) from time to time or to obtain exemption from passing of the examination of Computer Operation on the grounds of age criteria prescribed by Orders issued by the General Administration Department/ Information Technology, from time to time, before being promoted to the said posts.<br>**(B)** If any Government Servant who has been appointed by nomination to the posts mentioned in rules 3 to 5, shall fails to possess the Computer Operation Certificate, as regulated by the Government from time to time, before appointment, then he/she is required to possess the said certificate within the prescribed time limit. If any Government Servant fails to possess Computer Operation Certificate within the prescribed time limit, then he/she shall not be entitled for annual increment till possessing the said certificate. Further he/she shall not be entitled for promotion till possessing Computer Operation Certificate. |
| 10 | It shall be mandatory for the person who is appointed by nomination to the post mentioned in rules 3 to 5, to submit a (Declaration of Small Family) Rules, 2005 and the rules made thereunder from time to time, at the time of appointment to the concerned post. A person having more |

| | |
|---|---|
| | than two children on the date of submission of Declaration of Small Family, shall be disqualified for the appointment in Government Service. Moreover, the person shall be governed by Government Orders issued from time to time, in this behalf. |
| **11** | A person appointed to the posts mentioned in rules 3 to 5 shall be liable to transfer in any of the Government Dental Colleges under the Department in the State of Maharashtra. |
| **12** | Persons selected on the posts mentioned in Rules 3 to 5 should have registered their names as per provisions of the Dental Act, 1948 (16 of 1948) or their names should have been registered in the register maintained under the said Act. |
| **13** | A person appointed on the post, if so required, be liable to serve in any Defence services of India or in post connected with the Defence of India anywhere in or outside India for a period of not less than four years (including the period spent on training on such candidates), as may be determined from time to time by the Government of India: Provided that such person shall not be required to serve as aforesaid after expiry of ten years from the date of his appointment and ordinarily after he has attended the age of fifty-five years. |

| | |
|---|---|
| 14 | The terms and conditions prescribed in these Rules shall be complied with for appointment in the Government Service. Subsequently, the Maharashtra Civil Services Rules and other prevailing enactments/Government Resolutions/Government Orders with regard to service matters as prescribed from time to time, shall be applicable to the concerned Government servant. |

SCHEDULE – I

(*See* rules 3,4 and 5)

| Sr. No | Post | Educational Qualification | Experience |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Professor | A Bachelor's Degree in Dental Surgery from an Indian University with Masters in Dental Surgery or Diplomat of National Board recognized by the Government of India on the recommendation of council, in the concerned subject. | Experience of teaching the concerned subject as an Associate Professor in Government Dental College or any recognized Dental college for not less than five years. |
| 2 | Associate Professor | A Bachelor's Degree in Dental Surgery from an Indian University with Masters in Dental Surgery or Diplomat of National Board recognized by the Government of India on the recommendation of council, in the concerned subject. | Experience of teaching the concerned subject as an Assistant Professor in Government Dental College or any recognized Dental college for not less than four years after completion of Masters in Dental Surgery. |
| 3 | Assistant Professor (Promotion) | A Bachelor's Degree in Dental Surgery from an Indian University with Masters in Dental Surgery or Diplomat of National Board recognized by the Government of India on the recommendation of council, in the concerned subject. | Experience as Dental Surgeon in Government Dental Colleges and Hospitals or Government Medical Colleges and Hospital for not less than three years. |
| 4 | Assistant Professor (Nomination) | A Bachelor's Degree in Dental Surgery from an Indian University with Masters in Dental Surgery or Diplomat of National Board recognized by the Government of India on the recommendation of council, in the concerned subject. | Experience as a clinical Assistant or Dental Surgeon or senior Resident or Tutor or any equivalent post in Government Dental College or any recognized Dental or Medical College for not less than one year, gained after acquired the degree of Bachelor of Dental Surgery or Master of Dental Surgery. |

SCHEDULE – II
(*See* rules 3 and 4)

| Sr. No. | Category | Requirements | Points |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Category-I | 1) Journals Indexed to PubMed-Medline<br>2) Journals published by Indian or International Dental Specialty Associations approved by Dental Council of India | 15 marks for each contribution mentioned in column-3 |
| 2 | Category-II | 1) Medical or Dental Journals published by Government Health Universities awarding dental degree or Government Universities awarding dental degree<br>2) Original Research or study approved by the Indian Council of Medical Research (ICMR) or Similar Government Bodies.<br>3) Author of Text or Reference Book concerned to respective specialty<br>4) Doctor of Philosophy or any other similar additional qualification after Masters in Dental Surgery. | 10 marks for each contribution mentioned in column-3 |
| 3 | Category-III | 1) Journals published by Deemed Universities or Dental Institutions or Indian Dental Association.<br>2) Contribution of Chapters in the Text Book | 5 marks for each contribution mentioned in column-3 |

Note:-

1. For any publication, except original research, first author (principal author) shall be given 100% marks and remaining authors (co- authors) shall be given 50% marks and upto a maximum of 5 co-authors will be considered.
2. For original research, all authors shall be given equal points and upto a maximum of 6 authors shall be considered.
3. Maximum of 3 publications shall be considered for allotting points in Category III.
4. Publication in tabloids or souvenirs or dental news magazines or abstracts of conference proceedings or letter of acceptance shall not be considered for allotment of marks.
5. The candidate must have to secure minimum 30 and 20 marks from any one, two or all three categories mentioned in column-2 for the post of professor and Associate professor respectively.

Governor of Maharashtra, By order and in the name of the.

[ Vaishali Sule ]
Deputy Secretary,
to Government .

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

गो. ते. रुग्णालय आवार, ७ वा मजला,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.

दिनांक : डिसेंबर, 2022.

**अधिसूचना**

| | |
|---|---|
| **भारताचे संविधान** | क्रमांक : सेप्रनि-3019/प्र.क्र.117/19/वैसेवा-4 - भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 309 खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले सर्व नियम, आदेश वा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित) आणि सहायक प्राध्यापक, गट-ब (राजपत्रित) या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याव्दारे पुढील नियम करीत आहेत :- |
| 1. **संक्षिप्त नाव**, **प्रारंभ** | |
| | (१) या नियमांना महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व |

| | | |
|---|---|---|
| | औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत यांच्या आस्थापनेवरील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक, गट-अ (राजपत्रित) आणि सहायक प्राध्यापक, गट-ब (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, 2022 असे संबोधण्यात यावे. | |
| | (२) सदर नियम शासन राजपत्र प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. | |
| 2 | व्याख्या - या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, | |
| | क | “शासन” याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे; |
| | ख | “ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ” याचा अर्थ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 166 अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसुचिमध्ये विनिर्दिष्ट केलेला“ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ” असा आहे; |
| | ग | “संचालनालय” याचा अर्थ शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय असा आहे; |

| | | |
|---|---|---|
| | (घ) | “आयोग” याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे; |
| | (च) | “परिषद” याचा अर्थ भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली किंवा भारतीय दंत परिषदेच्या जागी केंद्र शासनाने नियुक्त केलेली इतर कोणतीही समतुल्य अधिकृत संस्था असा आहे; |
| | (छ) | “दंतशल्यचिकित्सेशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.डि.एस)” याचा अर्थ सांविधानिक विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी असा आहे; |
| | (ज) | “राष्ट्रीय मंडळाचा विद्यानिपुण (डीएनबी)” याचा अर्थ भारतीय दंत परिषदेची मान्यता असलेली संबंधित दंत विषयातील राष्ट्रीय परीक्षा मंडळाने प्रदान केलेली पदवी असा आहे; |
| | (झ) | “सहायक प्राध्यापक” याचा अर्थ वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या नियंत्रणाखालील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील कोणत्याही दंतशल्यचिकित्सा विषयातील सहायक प्राध्यापक असा आहे; |
| | (ट) | “सहयोगी प्राध्यापक” याचा अर्थ वैद्यकीय शिक्षण व |

| | | |
|---|---|---|
| | | संशोधन संचालनालयाच्या नियंत्रणाखालील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील कोणत्याही दंतशल्यचिकित्सा विषयातील सहयोगी प्राध्यापक असा आहे; |
| | (ठ) | "प्राध्यापक" याचा अर्थ वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या नियंत्रणाखालील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील कोणत्याही दंतशल्यचिकित्सा विषयातील प्राध्यापक असा आहे; |
| | (ड) | "मान्यताप्राप्त दंत महाविद्यालय" याचा अर्थ भारतीय दंत परिषदेने किंवा भारतीय दंत परिषदेच्या जागी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही समतुल्य अधिकृत संस्थेने मान्यता प्रदान केलेले दंत महाविद्यालय असा आहे; |
| | (ढ) | "मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय" याचा अर्थ भारतीय आर्युविज्ञान परिषदेने किंवा राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोग यांनी मान्यता प्रदान केलेले वैद्यकीय महाविद्यालय असा आहे; |
| | (ण) | "अनुसूची- I" याचा अर्थ या नियमांना जोडलेली अनुसूची-I असा आहे; |

| | | |
|---|---|---|
| | (त) | "अनुसूची- II" याचा अर्थ या नियमांना जोडलेली अनुसूची-II असा आहे. |
| | (थ) | "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ शासकीय सेवेतील संबंधित गट-अ च्या पदावर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारे मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे प्राधिकारी असा आहे.<br>गट-ब च्या संबंधित पदांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारे विभागाचे मंत्री हे प्राधिकारी असा आहे. |
| | (ध) | "ज्येष्ठतेच्या अधिन राहून पात्रता" म्हणजे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.01.08.2019 रोजीचा शासन निर्णय तसेच वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशातील अटी व शर्तीनुसार पदोन्नतीकरीता पात्रता निश्चित केली जाईल. |
| 3 **नियुक्तीचा मार्ग** | **प्राध्यापक**, गट-अ (राजपत्रित) या पदावरील नियुक्ती एकतर,-<br>(क) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील संबंधित दंत विषयातील सहयोगी प्राध्यापक, गट-अ हे पद धारण | |

| | |
| --- | --- |
| | करणाऱ्या तसेच अनुसूचि-I मधील अनुक्रमांक -1 समोरील स्तंभ क्रमांक 3 व 4 मधील अनुक्रमे शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या आणि अनुसूचि-II मधील तरतुदीनुसार शोधनिबंध प्रसिध्दीच्या अनुषंगाने किमान 30 गुणांची प्राप्ती करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर सुयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ; किंवा<br>(ख) स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारावर आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे;<br>(एक) :<br>(1) किमान वयोमर्यादा :- ज्याचे वय 18 वर्षांहून कमी नाही.<br>(2) कमाल वयोमर्यादा :- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयाची 50 वर्षे आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयाची 55 वर्षे.<br>परंतु, विहीत मार्गाने नियमित तत्त्वावर शासनाच्या सेवेत अगोदरच कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 5 वर्षांपर्यंत शिथील करण्यात येईल ;<br>परंतु आणखी असे की, शासन सेवेत आधीच कार्यरत असणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना वयोमर्यादेतील |

| | |
|---|---|
| | शिथिलतेची सवलत ते शासन सेवेतील कर्मचारी किंवा मागासवर्गीय कर्मचारी यापैकी केवळ एकाच कारणाकरीता घेता येईल.<br>(3) वयाची परिगणना: सदर पदावरील भरतीसाठी जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अर्जाच्या शेवटच्या तारखेला अर्जदारांनी वयाची किमान आणि कमाल वयोमर्यादेची अट पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>(दोन) शैक्षिणिक पात्रता:- ज्यांनी अनुसूची-I मधील अनुक्रमांक-1 समोरील स्तंभ क्रमांक 3 व 4 मधील अनुक्रमे अर्हता व अनुभव धारण केला आहे आणि जे अनुसूचि-II मधील तरतुदीनुसार शोधनिबंध प्रसिध्दीच्या अनुषंगाने किमान 30 गुणांची प्राप्ती करतात; |
| 4 | **सहयोगी प्राध्यापक**, गट-अ (राजपत्रित) या पदावरील नियुक्ती एकतर,-<br>(क) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील संबंधित दंत विषयातील सहायक प्राध्यापक, गट-ब हे पद धारण करणाऱ्या तसेच अनुसूचि-I मधील अनुक्रमांक -2 समोरील स्तंभ क्रमांक 3 व 4 मधील अनुक्रमे शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या आणि अनुसूचि-II मधील |

| | |
|---|---|
| | तरतुदीनुसार शोधनिबंध प्रसिध्दीच्या अनुषंगाने किमान 20 गुणांची प्राप्ती करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर सुयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने; किंवा<br>(ख) स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारावर आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे -<br>(एक) :<br>(1) किमान वयोमर्यादा :- ज्याचे वय18 वर्षाहून कमी नाही.<br>(2) कमाल वयोमर्यादा:- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयाची 45 वर्षे आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयाची 50 वर्षे.<br>परंतु, विहीत मार्गाने नियमित तत्त्वावर शासनाच्या सेवेत अगोदरच कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 5 वर्षांपर्यंत शिथील करण्यात येईल ;<br>परंतु आणखी असे की, शासन सेवेत आधीच कार्यरत असणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत ते शासन सेवेतील कर्मचारी किंवा मागासवर्गीय कर्मचारी यापैकी केवळ एकाच कारणाकरीता घेता येईल. |

| | |
|---|---|
| | (3) वयाची परिगणनाः सदर पदावरील भरतीसाठी जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अर्जाच्या शेवटच्या तारखेला अर्जदारांनी वयाची किमान आणि कमाल वयोमर्यादेची अट पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>(दोन) शैक्षणिक अर्हता:- ज्यांनी अनुसूची-I मधील अनुक्रमांक-2 समोरील स्तंभ क्रमांक 3 व 4 मधील अनुक्रमे अर्हता व अनुभव धारण केला आहे आणि जे अनुसूचि-II मधील तरतुदीनुसार शोधनिबंध प्रसिध्दीच्या अनुषंगाने किमान 20 गुणांची प्राप्ती करतात; |
| 5 | **सहायक प्राध्यापक**, गट-ब या पदावरील नियुक्ती एकतर,-<br>(क) शासकीय दंत किंवा वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दंतशल्यचिकित्सक, गट-ब हे पद धारण करणाऱ्या तसेच अनुसूचि-I मधील अनुक्रमांक -3 समोरील स्तंभ क्रमांक 3 व 4 मधील अनुक्रमे शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर सुयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने; किंवा<br>(ख) स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारावर आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे -<br>(एक) : |

| | |
|---|---|
| | (1) कमी वयाची मर्यादा :- ज्याचे वय18 वर्षाहून कमी नाही.<br><br>(2) जास्त वयाची मर्यादा:- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयाची 40 वर्षे आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयाची 45 वर्षे.<br><br>परंतु, विहीत मार्गाने नियमित तत्त्वावर शासनाच्या सेवेत अगोदरच कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 5 वर्षांपर्यंत शिथील करण्यात येईल ;<br><br>परंतु आणखी असे की, शासन सेवेत आधीच कार्यरत असणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत ते शासन सेवेतील कर्मचारी किंवा मागासवर्गीय कर्मचारी यापैकी केवळ एकाच कारणाकरीता घेता येईल.<br><br>(3) वयाची परिगणना: सदर पदावरील भरतीसाठी जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अर्जाच्या शेवटच्या तारखेला अर्जदारांनी वयाची किमान आणि कमाल वयोमर्यादेची अट पूर्ण करणे आवश्यक राहील.<br><br>(दोन) शैक्षणिक अर्हता:- ज्यांनी अनुसूची-I मधील अनुक्रमांक-4 समोरील स्तंभ क्रमांक 3 व 4 मधील अनुक्रमे अर्हता व अनुभव धारण केला आहे; |

| | |
|---|---|
| 6 | **<u>नियुक्तीचे प्रमाण :</u>**<br><br>नियम 3 व 4 मध्ये उल्लेखिलेल्या पदांवर पदोन्नती आणि नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण अनुक्रमे 50:50 असे असेल.<br><br>नियम 5 मध्ये उल्लेखिलेल्या पदावर पदोन्नती आणि नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण 15:85 असे असेल.<br><br>परंतु, पदोन्नतीद्वारे नियुक्ती देण्याकरीता योग्य उमेदवार उपलब्ध नसतील तर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या सहमतीने पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे करावयाच्या नियुक्तीकरीता विहीत करण्यात आलेले प्रमाण त्या भरती वर्षापुरते शिथील करुन सदर पदे नामनिर्देशनाद्वारे भरता येतील. |
| 7 | **<u>परिविक्षा कालावधी :-</u>**<br><br>नियम 3,4 व 5 मध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरीता परीविक्षाधीन राहील. परीविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार सदर परिविक्षा कालावधी (वाढीव |

| | |
|---|---|
| | कालावधीसह) तसेच विहीत प्रशिक्षण (असल्यास) त्यासह पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार सदर परिविक्षा कालावधी (वाढीव कालावधीसह) तसेच विहीत प्रशिक्षण (असल्यास) त्यासह समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास संबंधित व्यक्तीची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| 8 | हिंदी व मराठी भाषा परीक्षेबाबतची तरतूद :-<br>(क) नियम ३ ते 5 येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.<br>(ख) नियम 3 ते 5 येथे नमूद पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा नियुक्तीपूर्वी उत्तीर्ण केलेल्या नसतील तर, हिंदी भाषा व मराठी भाषा |

| | |
|---|---|
| | परीक्षा नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |
| 9 | संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूदः-<br>(क) नियम 3 ते 5येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने , पदोन्नतीपूर्वी संगणक हाताळणी ज्ञान प्राप्त करण्यासंदर्भात शासन (सामान्य प्रशासन विभाग / माहिती तंत्रज्ञान) यांनी वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार संगणक हाताळणी ज्ञान अर्हता प्रमाणपत्र प्राप्त करणे अथवा सदर प्रमाणपत्र प्राप्त करण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.<br>(ख) नियम 3 ते 5 येथे नमूद पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने संगणक हाताळणी ज्ञान प्राप्त करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, नियुक्तीपूर्वी संगणक हाताळणी ज्ञान अर्हता प्रमाणपत्र धारण |

| | |
|---|---|
| | केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत संगणक हाताळणी ज्ञान अर्हता प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत संगणक हाताळणी ज्ञान अर्हता प्रमाणपत्र धारण न केल्यास सदर संगणक हाताळणी ज्ञान अर्हता प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |
| 10 | लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाबाबतची तरतूद :- <br> नियम 3 ते 5 येथील पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम, 2005 मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमानुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करताना त्यामध्ये दोनपेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळेस हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील. त्याचप्रमाणे शासकीय सेवेत नियुक्तीनंतर संबंधित उमेदवारांस भविष्यात दोनपेक्षा अधिक हयात मुले |

| | |
|---|---|
| | असल्याचे सिध्द झाल्यास तो उमेदवार संबंधित पदासाठी अनर्ह ठरेल. |
| 11 | बदलीबाबतची तरतूद :- वरील नियम 3 ते 5 येथील अध्यापकीय संवर्गातील पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयात बदली होण्यास पात्र राहील. |
| 12 | नोंदणी करणे :- नियम 3 ते 5 येथील पदांवर नियुक्त झालेल्या व्यक्तींच्या नावाची नोंद दंतवैद्य अधिनियम, 1948 (1948 चा 16) च्या तरतुदीनुसार झालेली असावी अथवा या अधिनियमानुसार ठेवल्या जाणाऱ्या नोंदवहीत त्यांची नावे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. |
| 13 | कोणत्याही भारतीय संरक्षण सेवेमध्ये किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या पदावर भारतात किंवा भारताबाहेर चार वर्षे/चार वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी केंद्र शासनाने विहित केलेल्या अटीनुसार सेवा करणे :- |

| | |
|---|---|
| | शासनास आवश्यकता वाटली तर उपरोक्त पदावर नेमणूक केलेल्या व्यक्तीस कोणत्याही भारतीय संरक्षण सेवेमध्ये किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या पदावर भारतात किंवा भारताबाहेर चार वर्षे/चार वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी (प्रशिक्षणासाठी घालविलेला कालावधी जमेस धरुन) वेळोवेळी केंद्र शासनाने विहित केलेल्या अटीनुसार सेवा करावी लागेल.<br>परंतु, अशा व्यक्तीला, तिची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून 10 वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर किंवा सर्वसाधारणपणे तिच्या वयाची 55 वर्षे पूर्ण केल्यानंतर, त्यापैकी जे अगोदर घडेल, त्यानंतर वरील प्रमाणे सेवा करण्याची आवश्यकता असणार नाही. |
| 14 | शासकीय सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवाविषयक अन्य आदेश/नियम लागू होतील :-<br>शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी या नियमाद्वारे विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर नियमांनुसार शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, संबधित शासकीय कर्मचाऱ्यास, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, तसेच सेवाविषयक बाबींसदर्भात राज्य शासनाने |

| | |
|---|---|
| | वेळोवेळी अधिनयम/अधिसूचना/शासन निर्णय/ शासन आदेशाद्वारे निर्गमित केलेले अन्य नियम लागू राहतील. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वैशाली सुळे )

उपसचिव, महाराष्ट्र शासन

**अनुसूची – I**

(पहा नियम 4, 5 व 6)

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | प्राध्यापक | भारतीय मान्यताप्राप्त विद्यापीठाची दंतशल्यचिकित्सेच्या पदवीसह दंतशल्यचिकित्सेशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.डी.एस.) किंवा भारतीय दंत परिषदेच्या शिफारशीने केंद्र शासनाने मान्यता प्रदान केलेल्या संबंधित विषयातील राष्ट्रीय मंडळाचा विद्यानिपुण (डीएनबी). | शासकीय दंत महाविद्यालयात अथवा मान्यताप्राप्त दंत महाविद्यालयात संबंधित दंत विषयाच्या सहयोगी प्राध्यापक पदावरील अध्यापनाचा पाच वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव |
| 2 | सहयोगी प्राध्यापक | भारतीय मान्यताप्राप्त विद्यापीठाची दंतशल्यचिकित्सेच्या पदवीसह दंतशल्यचिकित्सेची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.डी.एस.) किंवा भारतीय | दंतशल्यचिकित्सेच्या पदव्युत्तर पदवीनंतर शासकीय दंत महाविद्यालयात अथवा मान्यताप्राप्त दंत महाविद्यालयात सहायक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दंत परिषदेच्या शिफारशीने केंद्र शासनाने मान्यता प्रदान केलेल्या संबंधित विषयातील राष्ट्रीय मंडळाचा विद्यानिपुण (डीएनबी). | प्राध्यापक पदावर संबंधित दंत विषयात अध्यापनाचा चार वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव |
| 3 | सहायक प्राध्यापक (पदोन्नती) | भारतीय मान्यताप्राप्त विद्यापीठाची दंतशल्यचिकित्सेच्या पदवीसह दंतशल्यचिकित्सेची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.डी.एस.) किंवा भारतीय दंत परिषदेच्या शिफारशीने केंद्र शासनाने मान्यता प्रदान केलेल्या संबंधित विषयातील राष्ट्रीय मंडळाचा विद्यानिपुण (डीएनबी). | शासकीय दंत किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दंतशल्यचिकित्सक या पदावर काम केल्याचा तीन वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव |
| 4 | सहायक प्राध्यापक (नामनिर्देशन) | भारतीय मान्यताप्राप्त विद्यापीठाची दंतशल्यचिकित्सेच्या पदवीसह दंतशल्यचिकित्सेची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.डी.एस.) किंवा भारतीय दंत परिषदेच्या शिफारशीने केंद्र शासनाने मान्यता प्रदान केलेल्या संबंधित विषयातील राष्ट्रीय मंडळाचा विद्यानिपुण (डीएनबी). | दंतशल्यचिकित्सेची पदवी अथवा पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर शासकीय दंत महाविद्यालयात अथवा मान्यताप्राप्त दंत किंवा वैद्यकीय महाविद्यालयात क्लिनिकल असिस्टट किंवा दंतशल्यचिकित्सक किंवा सिनीअर रेसिडेंट किंवा टयुटर किंवा समकक्ष पदावर काम केल्याचा एक वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव . |

**अनुसूची - II**

(पहा नियम 4, 5 व 6)

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यकता | गुण |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | प्रवर्ग-I | 1.पबमेड- मेडलाईनला अनुक्रमित असलेली नियतकालिके<br>2.भारतीय दंत परिषदेने मान्यता दिलेल्या भारतीय किंवा आंतरराष्ट्रीय दंत विशेषता संघटनांमार्फत प्रकाशित नियतकालिके | रकाना 3 मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक योगदानास 15 गुण |
| 2 | प्रवर्ग-II | 1. दंतशल्यचिकित्सकेची पदवी प्रदान करणारी शासकीय आरोग्य विज्ञान विद्यापीठे किंवा शासकीय विद्यापीठे यांच्यामार्फत प्रकाशित वैद्यकीय किंवा दंत नियतकालिके<br>2. भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषदेने (आय.सी.एम.आर.) अथवा समकक्ष शासकीय संस्थांनी मान्यता प्रदान केलेले मुळ संशोधन किंवा अध्ययन<br>3. संबंधित विषयाशी निगडीत पाठय किंवा संदर्भ पुस्तकांचा लेखक<br>4. दंतशल्यचिकित्सेची पदव्युत्तर पदवी ही अर्हता धारण केल्यानंतर डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी अथवा समकक्ष अतिरिक्त अर्हता प्राप्त असल्यास | रकाना 3 मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक योगदानास 10 गुण |
| 3 | प्रवर्ग-III | 1. अभिमत विद्यापीठे किंवा दंत संस्था किंवा भारतीय दंत संघटना यांनी प्रसिध्द केलेली नियतकालिके<br>2. दंतविषयाशी संबंधित पाठयपुस्तकातील प्रकरणामधील योगदान | रकाना 3 मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक योगदानास 5 गुण |

टिप :-

1 मुळ संशोधनाशिवाय इतर कोणत्याही प्रकाशनासाठी प्रथम लेखकास (मुळ लेखक) 100 % गुण प्रदान करण्यात येतील आणि उर्वरीत लेखकांना (सह लेखक) 50 % गुण प्रदान करण्यात येतील. (यासाठी कमाल 5 सह लेखकांचाच विचार करण्यात येईल.)

2 मुळ संशोधनाकरीता सर्व लेखकांना समान गुण प्रदान करण्यात येतील. (यासाठी कमाल 6 लेखकांचाच विचार करण्यात येईल.)

3 प्रवर्ग III मधील कमाल 3 शोधनिबंधाचाच गुण प्रदान करण्यासाठी विचार करण्यात येईल.

4 वृत्तपत्रातील लेखन किंवा स्मृतीलेख किंवा दंतवार्ता मासिके किंवा दंतपरिषदेतील गोषवारा किंवा नियतकालीकामध्ये प्रसिध्द होण्यासाठी दिलेले संमतीपत्र या सर्वांचा गुण प्रदान करण्याकरीता विचार करण्यात येणार नाही.

5 स्तंभ 2 मध्ये दर्शविलेल्या कोणत्याही एक, दोन अथवा सर्व तीन प्रवर्गात मिळून प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदाकरीता उमेदवाराने किमान अनुक्रमे 30 व 20 गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वैशाली सुळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

# <u>अनुसूची - १</u>

भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांची मान्यता प्राप्त असलेल्या खालील विषयातील पदव्युत्तर पदवी धारण करणारा उमेदवार अध्यापकीय संवर्गातील पदावरील नियुक्तीसाठी पात्र राहील.

१) " बालरोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

२) " मनोविकार परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

३) " सार्वजनिक आरोग्य परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

४) " स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

५) " वैद्यक व शल्यचिकित्सा परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "

६) " कर्करोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम "